# मिठीच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण

## टेराटॅकनिर्मित गोदावरी- ४ या टनेल बोरिंग यंत्राचा वापर



मिठी नदीखालील भुयारीकरण मेट्रो-३ प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक कामांपैकी एक होते. मुंबईतील गुंतागुंतीची भौगोलिक रचना, भूगर्भातील पाण्याची उच्च पातळीशिवाय कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे येणाऱ्या मर्यादा, यामुळे हे काम अधिकच कठीण होते; मात्र कर्मचाऱ्यांनी हे शिवधनुष्य यशस्वीपणे पार पाडले, याचा आनंद आहे.
**- रणजित सिंह देओल,** व्यवस्थापकीय संचालक

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १९ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (एमएमआरसी) बुधवारी (ता. १९) मिठी नदीखालील १.५ किलोमीटर लांबीच्या भुयाराचे काम पूर्ण करण्यात आले. टेराटॅकनिर्मित गोदावरी- ४ या टनेल बोरिंग यंत्राद्वारे (टीबीएम) बीकेसी ते धारावीपर्यंतच्या अंतरावरील हे काम पूर्ण झाले आहे.

बीकेसी येथून भुयाराच्या सुरुवातीच्या झोतापासून २१ ऑगस्ट २०१९ रोजी गोदावरी- ४ चे काम सुरू करण्यात आले होते. धारावीपर्यंत १ हजार ४३ आरसीसी रिंगसह हे भुयार पूर्ण झाले आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो- ३ मार्गाच्या भुयारीकरणाचा हा २९ वा टप्पा आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत सुमारे ८५ टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

या वर्षी मार्च महिन्यात टीबीएम मशीनने बीकेसी ते धारावीपर्यंत १.५ किमी डाऊन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण केले होते. बीकेसी ते धारावीपर्यंतच्या ३ किलोमीटर (अप आणि डाऊन) पैकी ४८४ मीटर भुयार सक्रिय मिठी नदीच्या पात्राखाली आहे. धारावी, बीकेसी, विद्यानगरी व सांताक्रूझ स्थानकांचा समावेश असलेल्या पॅकेज- ५ ने संपूर्ण ८ किलोमीटर लांबीचे भुयार पूर्ण केले आहे. प्रकल्पाचे आतापर्यंत १७ टीबीएमच्या मदतीने जवळपास ८५ टक्के भुयारीकरण आणि एकूण ५९ टक्के बांधकाम पूर्ण केले आहे.